ईमेल- dyceogadnbr@gmail.com
दुरध्वनी क्रमांक - ०२५६४ २१०२२४ /२१०२४१

# जिल्हा परिषद, नंदुरवार

## (सामान्य प्रशासन विभाग)

नवीन प्रशासकीय इमारत पहिला मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार-४२५४१२

जा.क्र:जिपनं/साप्रवि/आस्था-१/सर्वबदली/२२२/२०२२ — नंदुरवार दिनांक-२० /०४/२०२२

**अतिमहत्वाचे**

**ज्ञापन**

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.जिपव४१४/ प्र.क्रं.११२/आस्था१४ मुंबई दिनांक- १५ मे २०१४ मधील मार्गदर्शक सुचनांन्वये वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही पूर्ण करणेबाबत सुचीत केले आहे.तसेच शासन निर्णय दिनांक १५ मे २०१४ नुसार जिल्हास्तर व तालुकास्तरावरील बदल्यांचे वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणेसाठी वेळापत्रक निश्चीत करण्यांत आले आहे.

ग्राम विकास विभागाकडील शासन पत्र क्रं.संकीर्ण-२०२१/प्र.क्रं.-५८९/आस्था-१४ मुंबई दिनांक- १४/०७/२०२ अन्वये कळविल्यानुसार जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या सुधारीत धोरणानुसार संगणकीय प्रणालीद्वारे होत असल्याने त्यांना वगळून जिल्हा परिषदेच्या अन्य गट-क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या हया ग्रामविकास विभागाच्या दि.१५/५/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.९/७/२०२१ च्या शासन निर्णयात नमूद करण्यांत आलेल्या कालावधीत करणे बाबत निर्देश आहेत.

सर्वसाधारण बदल्या २०२२ साठी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत गट स्तरावर कार्यरत सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (सा.),वरिष्ठ सहाय्यक (मंत्रा.), कनिष्ठ सहाय्यक (मंत्रा.), वाहन चालक संवर्गातील कर्मचा-यांची खाते प्रमुख /गट प्रमुखांकडुन प्राप्त माहिती नुसार **तात्पुरती (अंतरिम)** वास्तव सेवाजेष्ठता यादी यान्वये प्रसिध्द करणेत येत आहे.

सदर यादी **www.zpndbr.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यांत आली असून याबाबत नोटीस बोर्डावर सूचना लिहून सर्व संबंधितांना याबाबत अवगत करण्यांत यावे.

सदर वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देवून याबाबत काही हरकती, दुरस्ती असल्यास विहीत वेळापत्रकानुसार सदर हरकत लेखी स्वरुपात योग्य त्या पुराव्यासह कागदपत्रासह कार्यालय प्रमुखांचे स्पष्ट अभिप्रायासह **दि.१८/०४/२०२२ ते दि.२७/०४/२०२२** या कालावधीत सामान्य प्रशासन विभागात सादर कराव्यांत. विहीत मुदतीनंतर प्राप्त हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर वास्तव सेवा जेष्ठता यादीतील आपल्या अधिनस्त कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती संबधीतांच्या मुळ सेवा पुस्तकावरुन फेर पडताळणी करण्यांत यावी व काही बदल अथवा दुरुस्ती असल्यास विहीत वेळेत या कार्यालयास अवगत करावे. आपल्या अधिनस्त कार्यरत वरील संवर्गाच्या सर्व कर्मचा-यांच्या वास्तव सेवा जेष्ठता यादीत समावेश असल्याची खात्री करावी जर एखाद्या बदलीपात्र कर्मचा-यांचे नाव सदर यादीत समाविष्ट नसल्यास सदर बाब तात्काळ या कार्यालयाच्या निदर्शनास आणुन देण्यांत यावी. तसेच जे बदलीपात्र कर्मचारी प्राधान्यक्रमानुसार उदा. पती पत्नी एकत्रीकरण, अपंग, विधवा, परितक्त्या, ५३ वर्षावरील कर्मचारी इ. लाभासाठी पात्र ठरत असतील अशा कर्मचा-यांचे आवश्यक पुरावा कागदपत्र, प्रमाणपत्र किंवा दाखले देखील तात्काळ या कार्यालयास सादर करावेत.

(आर.पी.पाटील )
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
**जिल्हा परिषद नंदुरबार**

**प्रत- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांना माहितीसाठी सविनय सादर.**

**प्रत- आवश्यक कार्यवाहीसाठी.**

**१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ———————— (सर्व) जि.नंदुरबार**

**२. बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.प्र. ———————— (सर्व) जि.नंदुरबार**

**३. नोडल अधिकारी, आय.टी.सेल, जिल्हा परिषद,नंदुरबार**

३/- सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (सा.), वरिष्ठ सहाय्यक (मंत्रा.), कनिष्ठ सहाय्यक (मंत्रा.), वाहन चालक संवर्गातील कर्मचा-यांची तात्पुरती (अंतरिम) वास्तव सेवाजेष्ठता यादी **www.zpndbr.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावी.

(आर.पी.पाटील )
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
**जिल्हा परिषद नंदुरबार**